<u>वार्तापत्र</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक-२७/०७/२०१८

**नक्षलवादास कंटाळलेल्या नागरिकांनी जाळला नक्षल कमांडर-जोगन्नाचा पुतळा**

➡ बंदुकीने नाही तर लोकशाहीनेच विकास साध्य होईल अशी व्यक्त केली भावना

नक्षल सप्ताहाच्या पार्श्वभुमीवर गडचिरोली पोलीस दलाच्या वतीने उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, कारवाफा येथे जनमैत्री मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. सदर मेळाव्याचा लाभ घेण्यासाठी दुर्गम व अतिदुर्गम भागातुन आदिवासी नागरिक उपस्थित झाले होते. मेळाव्यात विविध शासकिय योजनाची माहीती देवुन उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले.

माओवादयांनी आतापर्यंत खोटया क्रांतीची स्वप्ने दाखवुन आदिवासींची दिशाभुल केली आहे. माओवादी हे विकासातील अडथळा असुन, आदिवासी व इतर सामान्य जनतेचा विकास लोकशाहीच्या मार्गाने होवु शकतो. त्यासाठी आदिवासी जनतेनी माओवादयांच्या हिंसक क्रांतीचा विरोध करण्यासाठी, आपल्या मनात अनेक वर्षापासुन सुप्तावस्थेत असलेल्या रागाला वाट मोकळी करुन देत, “जहाल नक्षल कमांडर, उत्तर विभागीय कमिटीचा सदस्य व चातगाव दलम कमांडर-जोगन्ना ऊर्फ धिसु ऊर्फ चिमाला नरसय्या याचा प्रतिकात्मक पुतळा तयार करुन, मोठया आवाजात गगनभेदी, नक्षल विरोधी घोषणा देत, पुतळयाचे दहन केले.”

आदिवासी समाज हा साधा भोळा असुन, निष्कपट स्वभावाचा आहे. त्याच्या भोळेपणाच्या स्वभावाचा गैर फायदा घेत नक्षलवादयांनी, मागील अनेक वर्षापासुन आदिवासींचे शोषण केले आहे. सशस्त्र हिंसाचाराच्या मार्गाने राजकिय सत्ता ताब्यात घेण्याच्या या माओवादयांच्या प्रयत्नात आदिवासी समाज हा बळीचा बकरा ठरलेला आहे.

माओवादयांच्या हिंसक क्रांतीने आदिवासींचे केवळ नुकसान झाले असुन माओवादात आदिवासीच्या विकासाची कोणतीही योजना नाही. आतापर्यंत ७०० च्या वर आदिवासीची हत्या माओवादयांकडुन करण्यात आली असुन, वेळोवेळी बंद पुकारुन आदिवासींना विकासापासुन रोखण्याचा माओवादयांचा प्रयत्न सुरु आहे.

जनेतचा विकास हा केवळ लोकशाहीनेच शक्य आहे. अशा भावना यावेळी उपस्थित ३०० ते ४०० गावकऱ्यांनी व्यक्त केली.





